प्रो. प्रल्हाद डोंके
फॅक्स नं. ०७२९-२५६०५०९

क्र.नपप्रसं/कक्ष-११/निविदा-संविदा/सर्व नप/०९
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला
मार्ग, वरळी, मुंबई-४०००३०
दिनांक : , २००९

**15 जून 2009**

प्रति,
मुख्याधिकारी (सर्व)

विषय :- वृत्तपत्राच्या व नियतकालीकाच्या जाहिरात वितरण धोरण २००१ च्या नियमावलीत सुधारणा

संदर्भ :- १. स्थायी निर्देश ३६ क्र.नप्रसं/निविदा मागविणे/०५/प्र.क्र.१५१/०५/९ दिनांक २९ डिसेंबर २००७
२. स्थायी निर्देश ३६ (पूरक-१) आदेश क्र.नप्रसं/निविदा मागविणे/२००५/का ४३ दिनांक ऑगस्ट, २००७
३. शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन पूरक पत्र क्र. जाहिरात २००८/७३८/प्र.क्र.८०/३४, दि. १३.८.२००८

शासकिय जाहिरात वितरण धोरण नियमावली २००१ संदर्भाधीन दि. १ मे २००१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. त्यामध्ये दि. १३ ऑगस्ट २००८ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने

(दिलीप पायगुडे)
उपसंचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत :- प्रो. प्रल्हाद डोंके, संपादक
पांचजन्य, ममता प्रसारण,
झेंडा चौक, राजापेठ,
अमरावती ४४४६०६

वृत्तपत्रांच्या व नियतकालिकाच्या जाहिरात वितरण धोरण-२००१ च्या नियमावलीत सुधारणा करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन पूरकपत्र क्रमांक जाहिरात-२००८/७३८/प्र.क्र.८०/३४,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : १३ ऑगस्ट, २००८**

**वाचा:**-सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पीयुबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक १ मे, २००१

**शासन पूरकपत्र**

**शासकीय जाहिरात वितरण धोरण नियमावली, २००१,** संदर्भाधिन दि.१ मे, २००१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. **शासकीय जाहिरात वितरण धोरण-२००१ च्या** या शासन निर्णयातील **नियमावलीचे जोडपत्र अ मधील नियम क्र. ५-इ)** च्या तक्यातीलअनु.क्र.३ मधील रकाना ४ (१) मध्ये **अ वर्ग साप्ताहिकांचा** उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे मुख्यालयीन स्तरावर **अ वर्ग** साप्ताहिकांना जाहिरात वितरण करणे शक्य झालेले नाही. जाहिरात वितरित करण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने या शासन निर्णयातील त्रुटी दूर करण्यासाठी खालीलप्रमाणे **नियम क्र. ५-इ)** च्या तक्यातीलअनु.क्र.३ पुढील रकाना क्र. ४ मध्ये **(२)** हा मजकूर नव्याने अंतर्भूत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-.

| अ.क्र. १ | एका कामाचे मूल्य २ | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार ३ | जाहिरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र ४ |
|---|---|---|---|
| ३ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.५०.०० लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात | मुख्यालय | **२) 'अ' वर्ग दैनिकाबरोबरच संबंधित विभागातील 'अ' वर्गातील साप्ताहिकांना त्यांच्या प्रसिध्दीचा दिनांक व वार विचारात घेऊन वर्गीकृत जाहिरात वितरित करण्यात याव्यात. त्या-त्या विभागातील अ वर्ग दैनिकांच्या रोटेशनमध्ये शेवटच्या क्रमांकावर अ वर्ग साप्ताहिकांचा समावेश करुन जाहिराती देण्यात येतील. अशा प्रसंगी त्या जाहिरातीसाठी पुरेसा अवधी ठेवण्यात आला आहे, याची खात्री करुन घेण्यात येईल.** |

संदर्भाधिन दि. १ मे, २००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे अन्य तरतूदी त्याच रहातील.

संदर्भाधिन दि. १ मे, २००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे अन्य तरतूदी त्याच रहातील.

हा शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक **२००८०८१४१२२९३३००१** असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**(लिना वि. धुरु)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (मा. व ज.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्यसचिव यांचे सहसचिव, मुख्यसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सचिव (मा. व ज.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,(सदर शा.नि.त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या कृपया निदर्शनास आणवे.)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/(लेखा परीक्षा), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/(लेखा परीक्षा), नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
संचालक (माहिती/प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
सर्व उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
संचालक,(माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र, अे-८, स्टेंट एम्पोरियम इमारत, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११० ००१
उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
वरिष्ठ सहाय्यक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, श्री.काकुले यांची इमारत, दादा वैद्य रोड, पणजी, गोवा,
वित्त विभाग/व्यय-४ ।
निवड नस्ती.